# <u>महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ</u>

**<u>परिपत्रक</u>**

मका/ग्रंथालय/१६-१७/७७

दूरध्वनी क्र : ०२२-२४३०६७१७/४३२२६८२५
फॅक्स क्र.: ०२२-४२२१००१९
ई-मेल : mlwbpro53@gmail.com

हु.बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन (प), मुंबई - ४०० ०१३

दिनांक – ०५.०४.२०१६

**<u>विषय : दैनिके, साप्ताहिके, मासिके खरेदीबाबत.</u>**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील मध्यवर्ती कार्यालय (प्रसिद्धी व जनसंपर्क विभाग), कामगार क्रीडा भवन (एलफिन्स्टन, मुंबई), कामगार कल्याण भवन, ललित कला भवन, केंद्र स्तरावरील वाचनालये / ग्रंथालये / अभ्यासिका यात वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके खरेदीबाबत एप्रिल २०१६ या नवीन आर्थिक वर्षापासून पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. मध्यवर्ती कार्यालयाच्या प्रसिध्दी व जनसंपर्क विभागासाठी परिशिष्ट **“अ”** मध्ये जोडलेली १२ वर्तमानपत्रे खरेदी करण्यात यावीत.
२. कामगार क्रीडा भवन / कामगार कल्याण भवन / ललित कला भवनासाठी परिशिष्ट “अ” मधील कोणतीही ०६ वर्तमानपत्रे खरेदी करण्यात यावीत. परंतु उपरोक्त ठिकाणी **अभ्यासिका** असल्यास परिशिष्ट **“अ”** मधील कोणतीही ०८ वर्तमानपत्रे खरेदी करावीत.
३. मंडळाच्या सर्व कामगार कल्याण केंद्रांना परिशिष्ट **“अ”** मधील नमूद कोणतीही ०४ वर्तमानपत्रे खरेदी करावीत.

**किंवा**

केंद्रांनी परिशिष्ट **“अ”** मध्ये नमूद केलेले कोणतीही ०२ व स्थानिक पातळीवरचे कोणतेही ०२ वर्तमानपत्रे खरेदी करावीत.

४. ग्रंथालय हा उपक्रम चालतो, अशा ठिकाणी परिशिष्ट **“क”** मध्ये नमूद ५ साप्ताहिके आणि “ **ड”** मध्ये नमूद ५ मासिक/पाक्षिक खरेदी करावीत. तथापी, अभ्यासिका असतील अशा ग्रंथालयांनी परिशिष्ट **“क”** मध्ये नमूद १० साप्ताहिके आणि “ **ड”** मध्ये नमूद १० मासिके खरेदी करावीत.
५. वरील क्रमांक १ ते ४ मध्ये दर्शविलेल्या केंद्रांसाठी हिंदी किंवा उर्दु भाषेची दैनिके घ्यावयाची असल्यास परिशिष्ट **“ब”** मधील यादीतून खरेदी करावीत. तथापी दैनिके उपरोक्त मंजुरीपेक्षा जास्त होणार नाही, याची काळजी घ्यावी.

६. दैनिके/साप्ताहिके/पाक्षिके/मासिके कोणती असावीत हे स्थानिक केंद्र प्रमुखाने वाचकांची आवड लक्षात घेऊन खरेदी करावीत.

७. ज्या ठिकाणी अभ्यासिका हा उपक्रम चालतो तेथे दैनिके/साप्ताहिके/मासिके खरेदी करताना ती स्पर्धा परीक्षा व रोजगाराच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील याची काळजी घ्यावी.

   **उदा.** एम्पलॉयमेंट न्यूज (इंग्रजी), रोजगार समाचार (हिंदी), रीडर्स डायजेस्ट

८. महिना संपल्यानंतर सी.बी.द्वारा सदर वृत्तपत्रांच्या बिलांच्या रकमेची कार्यालयाकडे मागणी करावी. सदर बिलाची रक्कम ही रोख न देता धनादेशाद्वारेच संबंधित स्थानिक विक्रेत्याला उपलब्ध करुन द्यावी.

**"केंद्रांतर्गत वाचनालये"** या लेखा शिर्षकाखाली सदर खर्च करावा. विभाग प्रमुखाने आपल्याला ठरवून दिलेल्या तरतुदीच्या अधिन राहून बिले मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

<u>सदर परिपत्रक पुढील आदेश निघेपर्यंत अमंलात राहील.</u>

**सोबत : परिशिष्ट अ/ब/क/ड**

कल्याण आयुक्त

**प्रत :-**

१) सर्व अधिकारी, म.का./का.क्री.भवन, मुंबई
२) विभाग प्रमुख, सर्व विभागीय कार्यालये
३) गट प्रमुख, सर्व गट कार्यालये.
४) सहा. लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये.
५) कल्याण आयुक्तांचे स्वीय सहाय्यक, म.का., मुंबई
६) सर्व केंद्र प्रमुख व ग्रंथालय कर्मचारी

**सूचना** – गट कार्यालयांनी आपल्या अंतर्गत येणाऱ्या केंद्रांना सदर परिपत्रक निर्गमित करावे.

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

दि.०५.०४.२०१६

**मंडळातर्फे खरेदी करावयाच्या मान्यताप्राप्त दैनिके, साप्ताहिके, मासिकांची यादी.**

### (परिशिष्ट –अ)

| भाषा | दैनिकांची नाव |
|---|---|
| **मराठी** | मी मराठी लाईव्ह, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत, सकाळ, ॲग्रोवन, पुण्यनगरी, दिव्य मराठी, सामना, नवाकाळ, पुढारी, प्रहार, संध्यानंद, तरूण भारत, वृत्तमानस, नवशक्ति, महानगर, आपला वार्ताहर, मातृभुमी, देशोन्नती, वृत्तकेसरी, देशदूत, गांवकरी, सागर, रत्नागिरी टाईम्स, |
| **इंग्रजी** | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्स्प्रेस, डीएनए, हिंदुस्थान टाईम्स, इकोनॉमिक टाईम्स, फ्री प्रेस जर्नल |

### (परिशिष्ट- ब)

| दैनिकांची नाव | |
|---|---|
| **हिंदी** | **ऊर्दु** |
| नवभारत टाईम्स, नवभारत, दै.भास्कर, यशोभूमी, जागरुक टाईम्स | इनक्लाब, ऊर्दु टाईम्स, |

### (परिशिष्ट –क)

| अ.क्र. | साप्ताहिक | अ.क्र | साप्ताहिक | अ.क्र | साप्ताहिक |
|---|---|---|---|---|---|
| | **मराठी** | | **इंग्रजी** | | **हिंदी/ऊर्दु** |
| १ | लोकप्रभा | १ | योजना | १ | योजना |
| २ | सकाळ साप्ताहिक | २ | एम्पलॉयमेंट न्यूज | २ | रोजगार समाचार |
| ३ | मार्मिक | ३ | इंडिया टुडे | ३ | इंडिया टुडे |
| ४ | साधना | ४ | तहेलका | ४ | आखिल लोकक्रांती |
| ५ | चित्रलेखा | ५ | द विक | ५ | इन्कलाब |
| ६ | अंतराळ | ६ | दी संडे गार्डियन | ६ | शर्मा उर्दु |
| ७ | मराठी माती | ७ | स्पोर्ट्स स्टार | ७ | बिसवी सदी |
| | | | | ८ | हुम्मा उर्दु |

**(परिशिष्ट –ड )**

| अ.क्र. | मासिक | अ.क्र | पाक्षिक |
|---|---|---|---|
| १ | लोकराज्य (महा.शासन) | १ | फ्रंट लाईन - इंग्रजी |
| २ | सत्याग्रही | २ | द संडे इंडियन |
| ३ | स्मार्ट उद्योजक | ३ | गव्हर्नन्स नाऊ |
| ४ | बळीराजा | ४ | चंपक |
| ५ | शेतकरी | | |
| ६ | ॲग्रोटेक | | |
| ७ | सकाळ प्रिमियर | | |
| ८ | माहेर | | |
| ९ | गृहशोभिका | | |
| १० | मिळून साऱ्याजणी | | |
| ११ | चारचौघी | | |
| १२ | न्यू इंडिया (हिंदी) | | |
| १३ | रीडर्स डायजेस्ट – (इंग्रजी) | | |
| १४ | नॅशनल जिओग्राफीक – ट्रॅव्हलर इंडिया (इंग्रजी) | | |
| १५ | कॉम्पिटिशन सक्सेस रिव्ह्यू (हिंदी/इंग्रजी) | | |
| १६ | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक | | |